# कृति आराखडा.

**आपण ठरवलेले ध्येय कसे साध्य करता येईल?**

- प्रत्येक विद्यार्थ्यात १०वी–१२वीमध्ये मध्ये यशस्वी होण्यासाठी लागणारी किमान बुद्धिमत्ता असते.
- ध्येय साध्य करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन शिक्षकांकडून व इतर मदत–सहकार्य कुटूंबियांकडून घेता येईल.
- आपण याआधीच्या परीक्षांमध्ये मिळवलेल्या गुणांच्या आधारे ठरवलेले ध्येय साध्य करुच असा आत्मविश्वास.
- ध्येय साध्य करण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या सवयी व प्रेरणादायी मित्र परीवार.

**ध्येय साध्य करताना येणारे अडथळे.**

- आत्मविश्वास, शिक्षकांकडून मिळणारे मार्गदर्शन, कुटूंबियांकडून मिळणारी मदत–सहकार्य या पैकी एक किंवा अनेक घटकांचे कमी–अधिक प्रमाण.
- ध्येय साध्य करण्याच्या मार्गातील अडसर बनणाऱ्या सवयी
  – उदा. टि.वी.चा अवाजवी वापर.
- स्वतःसोबत दुसऱ्यांचेही नुकसान करणारा मित्र परीवार.

**ध्येय साध्य झाल्यावर मिळणारे फायदे.**

- स्वतःमधील क्षमतांची जाणिव होईल.
- यशस्वी होण्याची सवय जडेल व भविष्यात अशा प्रकारे इतरही ध्येये साध्य करता येतील.
- लोक तुमच्याकडे आदराने बघतील.
- इच्छेनुसार पुढील करीयरच्या दिशेने वाटचाल कराल.

**ध्येय साध्य न झाल्यास?**

काही प्रमाणात यश मिळून या अनुभवातून धडा घेता येईल.

- तुमच्यातील कमतरता, तुम्ही केलेल्या चुका यांची जाणिव होऊन पुढे त्या टाळता येतील.
- पण जर ध्येयच नसेल तर ??? कल्पनादेखील करवत नाही!

